# स्थानिक स्वराजच्या निवडणुकीत पहिल्या टप्प्यात २४६ नगर पालिका अन् ४२ नगरपंचायतीची निवडणूक पार पडणार

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार- शनिवार दि.१ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३


# महाविकास आघाडीचा ‘सत्याचा मोर्चा’

## विरोधकांच्या ‘सत्याचा मोर्चा’ला भाजपा ‘मूक आंदोलन’ करणार




Email.- dailydivyawarta@Gmail.com

Email.-editordivyawarta@gmail.com



दिव्य वार्ता





## आजचा मोर्चा संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण करून देणारा-शरद पवार

मुंबई ,(दिव्य न्युज):-आजच्या मोर्चाने जुन्या घटना आठवल्या. महाविद्यालयात शिकत असताना संयुक्त महाराष्ट्रासाठी असे मोर्चे निघाले. काळा घोडा आणि परिसरात असणारे हे मोर्चे एकप्रकारचा इतिहास घडवणारे मोर्चे होते. त्या मोर्चानंतर आज इतक्या मोठ्या संख्येने जी एकजूट लोकांनी या मोर्चात दाखवली ती संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची आठवण करून देणारी आहे असं शरद पवारांनी म्हटलं. विरोधकांनी निवडणूक आयोगाविरोधात काढलेल्या सत्याच्या मोर्चात ते सहभागी झाले होते.

यावेळी शरद पवार म्हणाले की, आपण एक महत्त्वाचा विषय हाती घेतला आहे. आम्ही स्वत:साठी काहीही मागत नाही. लोकशाहीत संविधानाने जो अधिकार सगळ्यांना दिला आहे त्याचे जतन करण्याची वेळ आली आहे. निवडणुका झाल्या, त्यात विशेषत: विधानसभा निवडणुकीत जे काही प्रकार घडले त्यामुळे सामान्य माणसांचा संसदीय लोकशाहीवरील विश्वासाला धक्का बसला. आज



अनेक ठिकाणी लोक अस्वस्थ आहेत. सोलापूरचे आमदार उत्तम जानकर यांनी त्यांचे अनुभव तुम्हाला सांगितले. सत्तेचा गैरवापर सातत्याने केला जात आहे. राजकीय मतभेद असू शकतात. निवडणुकीत संघर्ष असू शकतो परंतु या सगळ्या गोष्टी विसरून आम्हाला एक व्हावे लागेल. या देशातील मतांचा अधिकार, लोकशाहीचा अधिकार जतन करणे हे आमचे ▸▸ पान २ वर

## मी आज पुरावा आणलाय, म्हणत राज ठाकरेंनी भर गर्दीत गठ्ठ्यांचा ढीगच दाखवला

मुंबई, (दिव्य न्युज):- गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीप्रणीत विरोधी पक्षांच्या ‘सत्याचा मोर्चा’ची जोरदार चर्चा पाहायला मिळत होती. या पार्श्वभूमीवर आज मोर्चासाठी मोठ्या संख्येनं कार्यकर्ते, नागरीक व या पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. मुंबईत फॅशन स्ट्रीट ते मुंबई महानगर पालिका यादरम्यान निघालेल्या मोर्चानंतर पालिका भवनासमोर सर्व विरोधी पक्षांची जाहीर सभा झाली. या सभेत मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या भाषणात निवडणूक आयोगावर परखड शब्दांत हल्लाबोल केला. तसेच, निवडणूक मतदार याद्यांमधील



घोटाळ्याचे अक्षरश: ढीगभर पुरावेच राज ठाकरेंनी यावेळी सादर केले.

राज ठाकरेंनी यावेळी विरोधकांसोबतच सत्ताधारी आमदारही दुबार मतदारांची तक्रार करत असतील, तर मग तपास ▸▸ पान २ वर

## निवडणूक आयोगाकडे माझ्या नावाने अर्ज गेला-उध्दव ठाकरे

मुंबई, (दिव्य न्युज):- मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना उबाठा गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादीचे शरद पवार यांनी आज मुंबईत मतचोरीविरोधात सत्याचा मोर्चा काढला आहे. यावेळी उद्धव ठाकरे यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. सक्षम नावाच्या ॲपवरून माझ्या नावाने खोट्या नंबरवरून निवडणूक आयोगाकडे अर्ज केला गेला होता. व्हेरिफिकेशनसाठी हा अर्ज केला होता. माझ्यासह माझ्या कुटुंबाची चारही नावे मतदार यादीतून वगळण्याचा हा डाव असल्याचा मला संशय आहे, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. राज ठाकरे यांनी पुरावेच दिले आहेत. आपला पक्ष चोरला, नाव चोरले, वडील ▸▸ पान २ वर



## विरोधकांच्या ‘सत्याचा मोर्चा’ला भाजपा ‘मूक आंदोलन’ करुन देणार प्रत्युत्तर

मुंबई ,(दिव्य न्युज):- निवडणूक आयोगाच्या विरोधात आज शनिवारी (ता. १ नोव्हेंबर) महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाकडून आंदोलन करण्यात येत आहे. चर्चगेट येथील फॅशन स्ट्रीट ते मुंबई महानगरपालिका मुख्यालय असा मोर्चा मविआ आणि मनसे काढणार आहे. या मोर्चाला सत्याचा मोर्चा असे नाव देण्यात आले आहे. या मोर्चासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रमुख शरद पवार, काँग्रेस नेते, डाव्या पक्षांचे नेते, आदित्य ठाकरे, अमित ठाकरे आणि अन्य युवा नेतेमंडळी उपस्थित राहणार आहेत. पण विरोधकांच्या या मोर्चाविरोधात सत्ताधारी भाजपाने ‘मूक आंदोलन’ सुरू केले आहे. गिरगाव चौपाटी येथे हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

विरोधकांच्या सत्याचा मोर्चाला भाजपाने मूक आंदोलन करून प्रत्युत्तर देण्याचे ठरवले आहे. दक्षिण मुंबईतील गिरगाव चौपाटी या ठिकाणी भाजपा मूक आंदोलन करत आहे. या आंदोलनात भाजपा मुंबई अध्यक्ष अमित साटम, मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री आशिष शेलार देखील उपस्थित राहणार आहेत. परंतु, त्या आधीच आमदार योगेश सागर, आमदार विद्या ठाकूर, प्रवक्ते ▸▸ पान २ वर



## पंजाबमध्ये सिकंदर शेखला अटक

### आजच होता वाढदिवस,वडील रशीद शेख यांचे विधान

मुंबई, (दिव्य न्युज):- आंतरराष्ट्रीय पैलवान महाराष्ट्र केसरी सिकंदर शेखवर पंजाब पोलिसांनी कारवाई केल्यानंतर राज्यात कुस्ती क्षेत्रात खळबळ उडाली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचं प्रतिनिधित्व करणारा पैलवान सिकंदर शेखला पंजाब राज्यातील मोहाली येथे पोलिसांनी अवैध शस्त्र तस्करी प्रकरणात अटक करण्यात आली आहे. पंजाब पोलिसांनी राजस्थानातील पपला गुर्जर टोळीशी संबंध असल्याच्या संशयावरून सिकंदर शेखला अटक केली आहे. सिकंदर शेखचे वडिल रशीद शेख यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना सांगितले, कष्टाने आणि हमाली करून ▸▸ पान २ वर



### तीन वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाचा कॅप्टन होता

## आज घेतली मंत्रिपदाची शपथ

मुंबई , (दिव्य न्युज):- तीन वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाचं नेतृत्व करणारा खेळाडू आता मंत्री बनला आहे. टीम इंडियाचा हा माजी कर्णधार आता काँग्रेस पक्षामध्ये आहे. मोहम्मद अझरुद्दीनने मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. तेलंगण सरकारच्या मंत्रिमंडळात अझरुद्दीनचा मंत्री म्हणून समावेश झाला आहे. राजभवनाकडून पत्रक काढण्यात आलेलं. त्यात म्हटलेलं की, मोहम्मद अझरुद्दीन शुक्रवारी सकाळी मंत्रिपदाची शपथ घेईल. जिष्णू देव वर्मा यांनी अझरुद्दीनला मंत्रिपदाची शपथ दिली. ▸▸ पान २ वर



## व्येंकटेश मंदिरात चेंगराचेंगरी, ९ भाविकांचा मृत्यू, मुख्यमंत्र्यांकडून मदतीचे आदेश

आंध्र प्रदेश , (वृत्तसेवा):- आंध्र प्रदेशच्या श्रीकाकुलम जिल्ह्यातील काशीबुग्गा येथील श्री वेंकटेश्वर स्वामी मंदिरात आज (शनिवार) एकादशीच्या दिवशी भाविकांची चेंगराचेंगरी झाली. यामध्ये नऊ भाविकांचा मृत्यू झाल्याची भीती आहे. तर, अनेक भक्त गंभीर जखमी झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार,



कार्तिक मासमुळे मंदिरात मोठ्या संख्येने भाविक आले होते.या गर्दीवर स्थानिक प्रशासन आणि मंदिर प्रशासनाला नियंत्रण ठेवता आले नाही. भाविकांमध्ये अचनाक धक्काबुक्की सुरू झाली आणि ▸▸ पान २ वर

## तेलंगणानं जे केलं तेच महाराष्ट्र करणार, सरकारी रुग्णालयांबाबत निर्णय

पुणे , (दिव्य न्युज):- रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी आणि स्वच्छतेसाठी राज्य सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. संक्रमणजन्य आजारांचा धोका कमी करण्यासाठी आता राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांत रोज वेगवेगळया रंगांच्या



बेडशीटचा वापर करण्यात येईल. जालना जिल्हा शासकीय सामान्य रुग्णालयासह जिल्ह्यातील इतर प्रमुख रुग्णालयांतही हा निर्णय लागू करण्यात आला आहे. रुग्णालयातील प्रत्येक वॉर्डमध्ये हिरवा, गुलाबी आणि पांढरा अशा तीन रंगांच्या बेडशीट्स ठराविक क्रमाने बदलल्या जाणार आहेत.

स्वच्छतेसाठी राज्य सरकारचा नवा उपक्रम

या नव्या उपक्रमामुळे कोणत्या दिवशी कोणते बेडशीट वापरले आहे, हे लगेच ओळखता येणार आहे. ▸▸ पान २ वर

## केजमध्ये ’तीर्रट’ जुगार खेळणाऱ्या चौघांना अटक

केज, (दिव्य न्युज):- केज-बीड रोडवरील एका पेट्रोल पंपाच्या दिव्याच्या उजेडात ’तीर्रट’ नावाचा जुगार खेळणाऱ्या चार आरोपींना केज पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल आणि जुगाराचे साहित्य असा एकूण ४५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.गुरूवारी (दि.३० ऑक्टोबर) रात्री ८ वाजण्याच्या सुमारास केज पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश क्षीरसागर हे त्यांचे सहकारी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजू वाघमारे, पोलीस हवालदार प्रकाश मुंडे आणि गोरख फड यांच्यासह रात्रगस्त घालत पान २ वर

# अंबाजोगाईत साजरी झाली खड्ड्यांची दिवाळी





अंबाजोगाई, (दिव्य न्युज):- दिवाळीच्या प्रकाशात उजळणाऱ्या अंबाजोगाई शहरात यंदा दिवे रस्त्यांवर नव्हे तर खड्ड्यामध्ये पेटले ! शहरातील रस्त्यांची बिकट अवस्था आणि प्रशासनाचे मौन पाहून संतप्त नागरिकांनी अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. पाडव्याच्या दिवशी त्यांनी रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये दिवे, मेणबत्त्या, रांगोळ्या आणि पुष्पहार ठेवून खड्ड्यांची दिवाळी साजरी केली. हा आगळा-वेगळा निषेध पाहण्यासाठी मोठी गर्दी जमली होती.

नागरिकांचे म्हणणे आहे की, अंबाजोगाई शहरातील सिमेंट रस्त्यांवर सार्वजनिक बांधकाम विभागाने काही महिन्यांपूर्वी कोट्यवधी रुपये खर्च करून कामे केली. मात्र काही महिन्यांतच रस्त्यांवर शेकडो खड्डे, भेगा आणि उखडलेले सिमेंट दिसू लागले. पावसात या खड्ड्यांत पाणी साचल्याने नागरिकांना प्रवास करणे अवघड झाले आहे. अनेक दुचाकीस्वारांना अपघातांचाही सामना करावा लागला.आम्ही कररूपाने शासनाला कष्टाचे पैसे देतो, पण तेच पैसे खड्ड्यांमध्ये जात आहेत, अशी खंत नागरिकांनी व्यक्त केली. गणेश ोत्सव, नवरात्र, दसरा आणि दिवाळी सर्व सण संपले तरी रस्त्यांचे दुःख कायम असल्याचे ते म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की, अनेक ठिकाणी रस्ते वर आणि नाल्या खाली, तर काही ठिकाणी नाल्या उंच असल्याने पावसाचे पाणी थेट घरात, दुकानात आणि मंदिरात शिरले. अशा निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे शासनाचे हजारो कोटी रूपये अक्षरशः वाया गेले आहेत.

स्थानिक युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने या अनोख्या आंदोलनात सहभागी झाले. त्यांनी खड्ड्यांमध्ये दिवे लावले, रांगोळ्या काढल्या आणि फटाके फोडून झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला. नागरिकांनी संताप व्यक्त करत सांगितले की, खड्डे बुजविण्या ऐवजी आम्हालाच आता त्यांची पूजा करावी लागते हेच आमचे दुर्दैव। प्रशासनाने या गंभीर समस्येकडे लक्ष न दिल्यास मोठी दुर्घटना घडू शकते, असा इशारा देत राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांबाबत आपण बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे लवकरच तक्रार करणार आहोत.दरम्यान, नागरिकांनी अंबाजोगाईतील सर्व मुख्य रस्त्यांची तातडीने दुरुस्ती आणि दर्जा तपासणी करण्याची मागणी केली आहे. शहरात मात्र अजूनही रस्त्यांवर खड्डे आणि लोकांच्या चेहऱ्यावर असंतोषच दिसतोय.

# तब्येतीमुळे मोर्चा अन् दररोजची पत्रकार परिषदही चुकली

## पण त्याच टायमिंगला ट्विट करत लक्ष वेधलं!

मुंबई , (दिव्य न्युज):- प्रकृतीच्या कारणास्तव शिवसेना खासदार संजय राऊत यांना पुढील दोन महिने डॉक्टरांनी विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे नित्य नियमाने होणारी आज (१ नोव्हेंबर) पत्रकार परिषद होऊ शकली नाही. मात्र संजय राऊत यांनी आज महाविकास आघाडीसह मनसेचा होत असलेल्या मोर्चावरून मात्र ट्विट करत प्रतिक्रिया दिली. त्यामुळे नित्य नियमाची पत्रकार परिषद चुकली असली, तरी त्याच वेळेला आपणास संजय राऊत यांनी क्वीट करत मोर्चावर भाष्य केलं आहे.

संजय राऊत यांनी ट्विट करत म्हटलं आहे की, हा मोर्चा ऐतिहासिक क्रांतिकारक आणि निर्णायक ठरणार आहे. महाराष्ट्राने देशाला नेहमीच दिशा दाखवली. ठिणगी पडताना दिसत आहे. जय महाराष्ट्र! या ट्विटसोबत त्यांनी मोर्चाला येण्याचे आवाहन करणारे ग्राफिक्स शेअर केलं आहे. त्यामध्ये म्हटलं आहे की, बोगस मतदारांचं बोगस रुप उघडं करण्यासाठी सत्याचा मोर्चा, खोट्या मतदार यादी विरोधातील या भव्य मोर्चात खऱ्या मतदारांनी सामील व्हा. राऊत निवडणूक आयोगाविरुद्ध विरोधी पक्षांच्या निदर्शनात सहभागी होतील अशी अपेक्षा होती. मात्र, प्रकृतीच्या कारणास्तव त्यांना विश्रांती घ्यावी लागली आहे.



दरम्यान संजय राऊत यांनी त्यांच्या प्रकृती संदर्भात त्यांनी काल अपडेट दिल्यानंतर देशपातळीवरून लवकरात लवकर बरं होण्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही संजय राऊत यांना लवकरात लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. मोदींनी ट्विट करत म्हटले आहे की, तुमच्या लवकर बरे होण्यासाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी प्रार्थना करत आहे, संजय राऊतजी. संजय राऊत यांनी उत्तर दिले, माझे कुटुंब तुमचे आभारी आहे. आरोग्याच्या कारणास्तव, राऊत यांनी सार्वजनिक जीवनातून दोन महिन्यांची विश्रांती घेतली आहे. शिवसेना खासदार संजय राऊत राज्यातील एकहाती विरोधी पक्षनेते मानले जातात आणि ते भाजप आणि एनडीए सरकारच्या धोरणांचे निर्भय टीकाकार आहेत. राऊत यांच्या जवळच्या सूत्रांनी सांगितले की, डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे, २०१९ आणि २०२० मध्ये त्यांच्या दोन अँजिओप्लास्टी झाल्या होत्या.

पान ४ वरून

## कुप्पा गावच्या

अडीच वर्षांपूर्वी निवड झाली होती. त्यानंतर सुरेश सावंत यांना ही संधी देण्याचे ठरले होते. त्यानुसार रामराव पवार यांनी शब्द पाळत राजीनामा दिला होता. रिक्त जागेवर प्रशासनाने नुकतीच निवडणूक घेतली या निवडणुकीत रत्नमाला सखाराम सावंत यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे स्वागत त्यांचे सुपुत्र सुरेश सावंत यांचा सत्कार करून आमदार प्रकाश दादा सोळंके, युवा नेते जयसिंग भैया सोळंके, पंचायत समितीचे माजी सभापती प्रशांत बापू सावंत, तालुका अध्यक्ष बजरंग साबळे, जिल्हा परिषद सदस्य औदुंबर काका सावंत, माजी सरपंच डॉक्टर प्रवीण सावंत, माजी सरपंच सुभाषराव सावंत, चेअरमन दत्तात्रय मायराने, काळे, सरपंच सोनवणे यांच्यासह जिजाबाई रामराव पवार, रोहिदास बळीराम राठोड, अर्जुन मसाजी मुजमुले, संजय भीमराव पवार, कमल प्रल्हाद सोनवणे आदी मान्यवरांनी सत्कार करून सुरेश सावंत यांना शुभेच्छा दिल्या.

## जिंतूर तालूक्यातील

नेण्यात आले. त्यांच्यावर परभणीच्या रुग्णालयात उपचार चालू आहेत. स्विफ्ट कार, प्रवासी ऑटो व मालवाहू ऑटो मधील अनेक नागरिक या अपघातात किरकोळ जखमी झाले आहेत त्यांच्यावर बोरी येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. हा अपघात झाल्यानंतर बोरीच्या पोलीस स्टेशनचे बीट जमादार दिलावर खान पठाण यांनी अपघात स्थळाला भेट दिली.

## खोटेपणा उघड

शरद पवार आपल्या भाषणात म्हणाले की, 'देशाची लोकशाही टिकवण्यासाठी कष्ट करायला तयार असलेले तुम्ही बंधू भगिनी. आजचा मोर्चा मला जुन्या गोष्टी आठवण करून देतो. मला आठवतंय १९७८-८९ या काळात महाविद्यालयात शिकत असताना संयुक्त महाराष्ट्रात असाच मोर्चा निघाला होता. काळा घोडा आणि त्याचा परिसर तिथे मोर्चे एक प्रकारचा विचार समन्वय दाखवणारे मोर्चे होते. तुम्ही सर्वांनी जी जबरदस्त एकजूट दाखवली. त्यातून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ होती, त्याची आठवण होते. आज महत्त्वाचा विषय आपण हातात घेतला. आपण स्वतसाठी काही मागत नाही. आपण एवढंच म्हणतोय की लोकशाहीत संविधानाने तुम्हा आम्हाला अधिकार दिला त्याची जतन करणं याची वेळ आली आहे.

पान १ वरून

## आजचा मोर्चा संयुक्त

कर्तव्य आहे असा निर्धार केला पाहिजे असं त्यांनी सांगितले.

तसेच काही ठिकाणी लोक तक्रारीसाठी पुढे आले. बनावट आधार कार्ड बनवले जाते अशी माहिती दिली, त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी सिद्ध करून दाखवा असं आव्हान दिले. जेव्हा बनावट आधार कार्ड दाखवून दिले. त्यानंतर ज्याने हा आरोप सिद्ध करून दाखवला त्याच्यावर गुन्हा दाखल केला. हा कुठला न्याय..जर एखादा आरोप सिद्ध करून कुणी दाखवला त्याच्यावर गुन्हे दाखल केले जातात. याचा अर्थ शासन या सगळ्याला संरक्षण देत आहे. त्यामुळे तुमची आणि माझी जबाबदारी आहे. काहीही करा परंतु आम्ही या मतदानातील चोरी थांबवणार असा इशारा शरद पवारांनी दिला आहे.दरम्यान, आज इथे असणाऱ्या अनेक पक्षाची विचारधारा वेगळी आहे. कधी मतभेदही असतात. पण आज देशातील संसदीय लोकशाही टिकवायची असेल. मतांचा अधिकार टिकवायचा असेल आपल्याला एक व्हावे लागेल असं आवाहन शरद पवारांनी लोकांना केले.

सत्याचा मोर्चाच्या प्रमुख चार मागण्या

निवडणूक आयोग आणि मतदान प्रक्रियेतील गोंधळाविरोधात विरोधकांनी महाएल्गार पुकारला आहे. सत्याचा मोर्चातून निवडणूक आयोगाला विरोधक शिंगावर घेणार आहेत. फॅशन स्ट्रीट ते मुंबई महापालिकेपर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार आहे. दुपारी १ वाजता हा मोर्चा सुरू होणार आहे. या मोर्चासाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दादर येथून स्लो लोकलने चर्चगेटपर्यंत प्रवास केला. ते या मोर्चाच्या दीड तास अगोदरच दाखल झाले आहेत. मोर्चाच्या तयारीची ते आढावा घेणार असल्याचे कळते.

मतदार याद्यांतील घोळाविरोधात सत्याचा मोर्चाची दुपारी १ वाजता सुरुवात होणार आहे. या मोर्चासाठी राज ठाकरे हे अगोदरच दाखल झाले आहेत. त्यांनी लोकलने प्रवास केला. तर आता इतर नेतेही लवकरच दाखल होतील. शरद पवार हे दुपारी १२ वाजता या मोर्चासाठी निघतील. तर उद्धव ठाकरे हे मातोश्रीवरून निघतील. काँग्रेसचे नेते ही या मोर्चात दाखल होतील. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ या मोर्चात दिसतील की नाही याची चर्चा सुरू आहे. डाव्या पक्षाचे नेतेही या मोर्चाच सहभागी होणार आहे. मुंबई महानगरपालिका मुख्य इमारती समोर पुण्यातून जागरण गोंधळ घालणारे दाखल झाले. संबळ वाजवून जागरण गोंधळाला सुरुवात झाली आहे .राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येऊ द्या शिवसेना आणि मनसेचे सरकार येऊ द्या यासाठी तुळजाभवानीकडे गोंधळी प्रार्थना करणार आहे.

विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये मतदार याद्यांमध्ये हेराफेरी करून भाजप सरकार सत्तेवर आल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून सातत्याने याविषयीची चर्चा, बैठका आणि पत्रकार परिषद घेऊन वातावरण निर्मिती करण्यात येत आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी यापूर्वी तीन वेळा पत्रकार परिषद घेऊन मतदार यादीतील घोळावर प्रेंझेटशन केले आहे. त्यात त्यांनी देशातील कर्नाटक आणि महाराष्ट्रातील राजूरा विधानसभा मतदारसंघातील मतदानातील हेराफेरीचा आरोप केला. तर या चार प्रमुख मागण्या या मोर्चातून करण्यात येत आहेत.

सत्याचा मोर्चा हा फॅशन स्ट्रीट येथून दुपारी १ वाजता मोर्चाला सुरुवात होणार आहे. मेट्रो सिनेमामार्गे हा मोर्चा मुंबई महापालिकेसमोर येईल. येथे या मोर्चाचे सभेत रुपांतर होईल. या ठिकाणी प्रमुख नेते मोर्चेकरांना, आंदोलकांना मार्गदर्शन करतील. या मोर्चाला पोलिसांनी अद्यापही परवानगी दिली नसल्याची माहिती समोर येत आहे.

## मी आज पुरावा

करण्यासाठी अडवलं कुणी? असा सवाल उपस्थित केला. आम्ही बोलतोय, उद्धव ठाकरे बोलतायत, शरद पवार बोलतायत की याद्यांमध्ये दुबार मतदार आहेत.

शेतकरी कामगार पक्षही बोलतोय, कम्युनिस्ट पक्षाचे लोक बोलतायत, काँग्रेसचे लोक बोलतायत. एवढंच नाही, भाजपाचेही लोक बोलतायत की दुबार मतदार आहेत. शिंदेंचे, अजित पवारांचेही लोक बोलतायत. अरे मग अडवलं कुणी? मग हे निवडणूक घेण्याची घाई का करत आहेत? साधी गोष्ट आहे. मतदारयाद्या साफ करा. त्यानंतर जेव्हा निवडणुका होती, त्यात यश-अपयश सगळ्या गोष्टी मान्य असतील. सगळं लपवून-छपवून चाललंय, ते कशासाठी? असा सवाल राज ठाकरेंनी केला.

कल्याण ग्रामीण, डोंबिवली, मुरबाड, भिवंडीतले ४५०० मतदार आहेत. या मतदारांनी तिथेही मतदान केलं आणि मुंबईच्या मलबार हिल मतदारसंघातही मतदान केलं आहे. महाराष्ट्रभर असे लाखो लोक आहेत जे या मतदानासाठी वापरले गेले, असा दावा करत राज ठाकरेंनी वेगवेगळ्या मतदारसंघात किती दुबार मतदार आहेत, याची एक यादीच वाचून दाखवली.हे लोक म्हणतात पुरावे कुठे आहेत. मी आज पुरावे आणले आहेत, असं म्हणत राज ठाकरेंनी यावेळी यादीच वाचून दाखवली. १ जुलैपर्यंतच्या यादीनुसार मुंबई नॉर्थ मतदारसंघात १७ लाख २९ हजार ४५६ मतदार आहेत. त्यापैकी ६२ हजार ३७० दुबार आहेत. मुंबई नॉर्थ-वेस्ट मध्ये १६ लाख ७४ हजार ८६१ मतदार आहेत. त्यात ६० हजार २३१ दुबार मतदार आहेत. मुंबई नॉर्थ इस्टमध्ये १५ लाख ९० हजार ७१० मतदार आहेत. त्यायत ९२ हजार ९८३ दुबार मतदार आहेत. मुंबई नॉर्थ सेंट्रलमध्ये १६ लाख ८१ हजार ०४८ मतदार आहेत. त्यात ६३ हजार ७४० दुबार आहेत. मुंबई साऊथ सेंट्रलमध्ये १४ लाख ३७ हजार ७७६ मतदार असून त्यात ५०५६५ दुबार मतदार आहेत. मुंबई साऊथमध्ये १५ लाख १५ हजार ९९३ पैकी ५५ हजार २०५ दुबार मतदार आहेत. नाशिक लोकसभेत १९ लाख ३४ हजार ३४९ पैकी ९९ हजार ६७३ दुबार मतदार आहेत. मावळ लोकसभेत १९ लाख ८५ हजार १७२ पैकी १ लाख ४५ हजार ६३६ दुबार मतदार आहेत. पुणे लोकसभेत १७ लाख १२ हजार २४२ पैकी १ लाख २ हजार ०२ दुबार मतदार आहेत. ठाणे लोकसभेत २ लाख ९ हजार ९८१ दुबार मतदार आहेत, असं राज ठाकरे म्हणाले.

## निवडणूक आयोगाकड

चोरायचा प्रयत्न केला. आता हेही कमी नाही म्हणून मतदार चोरी करायचा प्रयत्न केला गेला आहे. महाराष्ट्र देशाला दिशा दाखवतो. सर्वांना आवाहन करतो की, सर्वांनी मतदारयादीतील नावे तपासा. मुख्यमंत्र्यांना आव्हान देतो की, काय तो पर्दाफाश कराच. मुख्यमंत्र्यांनीही मान्य केले, की मतचोरी होतेच आहे, असे ठाकरे म्हणाले.दोन दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाचे अधिकारी मातोश्रीवर आले होते. मला विचारतात की, हा नंबर तुमचा आहे का, मी खोटा असल्याचे त्यांना सांगितले. यावर ते तुम्हाला अजून काही सांगायचे आहे का असे त्यांनी विचारले. मी म्हणालो तुम्ही आलात माझ्याकडे, मला काय ते सांगा, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

आम्हालाही निवडणुका हव्या आहेत. आम्ही यांना लोकशाहीच्या मार्गाने ठोकण्यासाठी आसुसलेले आहोत. प्रामाणिकपणे आम्ही सर्व मार्ग अवलंबत आहोत. न्यायालयात तरी न्याय मिळतो की नाही याची परीक्षा होणार आहे. मतचोर दिसेल, तिथे त्यांना फटकवा. परत सांगतो, आज ही सगळी एकजूट झालेली आहे. ॲनाकोंडा बसलेला आहे. जशी निवडणूक येईल, तशी दडपशाही सुरू होईल. हे सगळे पुरावे घेऊन आम्ही न्यायालयात जाणार आहोत. निवडणूक आयोग लाचार झालेला आहे. शिवसेनेची केस सर्वोच्च न्यायालयात सुरुच आहे, तुमच्या मनगटात ताकद आहे. आम्ही तुमच्यासाठी एकत्र आलो आहोत. दोन भाऊ एकत्र आले, आता झाले असे वाटून घेऊ नका. महाराष्ट्राने आवळलेली मूठ असलेला फोटो मतचोरांना पाठवा, असे ठाकरे म्हणाले.

## विरोधकांच्या 'सत्याचा

नवनाथ बन हे आंदोलन स्थळी उपस्थित होऊन त्यांनी या मोर्चाला सुरुवात केली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून भाजपाकडून विरोधकांना जोरदार प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या मूक आंदोलनाबाबत मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, एका वेळेस आपण असे काही करू शकतो. पण पुन्हा पुन्हा सारखी तीच तीच स्ट्रॅटेजी चालणार नाही. विरोधकांना पण माहीत आहे की, लोक त्यांच्याबरोबर नाहीत. लोक पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत आहेत. विरोधकांचे काय हाल होणार आहेत, हे लोकांना माहीत आहे. फक्त मुंबई महापालिका नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात विरोधकांचा सुपडा साफ होणार आहे. तर, लोकांना मोदी आणि फडणवीस यांच्यासोबत विकास पाहिजे आहे, असे म्हणत मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे.

## तेलंगणानं जे केलं

रुग्णालयात बेडशीट, उशांचे कव्हर, ब्लँकेट, पडदे, गणवेश आणि टॉवेल यांसह सर्व वस्त्रांची धुलाई आता पूर्णतः यांत्रिक आणि निर्जंतुकीकरण पद्धतीने करण्यात येईल. या यंत्रणेमुळे मानवी हस्तक्षेप टाळला जाईल आणि संसर्गजन्य आजारांचा धोका कमी होईल. नव्या स्वच्छता प्रणालीमुळे हॉस्पिटलमधील स्वच्छता राखली जाईल, तसेच रुग्णांच्या आरोग्य सुरक्षिततेतही लक्षणीय सुधारणा होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

हॉस्पिटलमध्ये आता दररोज ठराविक रंगांच्या बेडशीटचा वापर केला जाणार आहे. सोमवार आणि गुरुवारी हिरवा रंग, मंगळवार आणि शुक्रवारी पांढरा रंग, तर बुधवार आणि शनिवारी गुलाबी रंगाच्या बेडशीट्स वापरल्या जातील. रंगानुसार दिवस ठरवला असल्याने कोणती बेडशीट आधी वापरली आहे, हे समजण्यास मदत होणार आहे. या नियमामुळे प्रत्येक वॉर्डमधील बेडशीट रोज बदलली जाणार आहेत.दरम्यान, बेडशीट बदलण्याचा हा उपक्रम तेलंगणा राज्याने सर्वप्रथम राबवला होता आणि त्याचे चांगले परिणाम दिसून आले. त्यानंतर आता महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांतही हा निर्णय लागू करण्यात आला आहे.

## केजमध्ये 'तीर्रट' जुगार

होते. यावेळी एका गुप्त खबऱ्याने त्यांना माहिती दिली की, केज-बीड रोडवरील रेणू पेट्रोल पंपाजवळ विजेच्या दिव्याखाली काही इसम 'तीर्रट' नावाचा जुगार खेळत आहेत.

माहिती मिळाल्यावर रात्री ८:४५ वाजता क्षीरसागर व त्यांच्या पथकाने तातडीने छापा टाकला. यावेळी अशोक दादाराव भोसले (४०, रा. पांढऱ्याचीवाडी), प्रदीप प्रभाकर भोसले (२४, रा. पांढऱ्याचीवाडी), दादाराव भगवान भोसले (४२, रा. खरडेवाडी) आणि गोकुळ चत्रभुज भोसले (३२, रा. खरडेवाडी) हे चौघे गोलाकार बसून जुगार खेळताना आढळले. पोलिसांनी या चौघांना ताब्यात घेऊन त्यांची अंगझडती घेतली. यामध्ये त्यांच्याकडून रोख १३ हजार आणि दोन मोबाईल फोनसह जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ४५ हजार रुपये आहे.सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश क्षीरसागर यांच्या फिर्यादीवरून या चौघांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु. र. नं. ६००/२०२५, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १९८७ चे कलम ३ व ४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजू वाघमारे हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## आज घेतली

मोहम्मद अझरुद्दीनला मंत्री बनवायला भाजपने विरोध केला आहे. मोहम्मद अझरुद्दीनला मंत्री बनवण्यामागे फक्त आगामी ज्युबली हिल्सच्या पोटनिवडणुकीत मतदारांच्या एका समुदायाला आकर्षित करुन मत मिळवण्याचा उद्देश आहे. हे आदर्श आचारसंहितेच उल्लंघन आहे अशी भाजपच्या शधीधर रेड्डी यांनी टीका केली.

आदर्श आचारसंहिता सगळ्या हैदराबाद शहराला लागू नाही. पण राज्य मंत्रिमंडळात अझरुद्दीनचा समावेश करण्याच्या प्रस्तावामुळे ज्युबली हिल्सच्या पोटनिवडणुकीवर परिणाम होऊ शकतो. अझरुद्दीन तिथला मतदार आहे असं शधीधर रेड्डी म्हणाले.२०२३ च्या विधानसभा निवडणुकीत मोहम्मद अझरुद्दीनने ज्युबली हिल्स मतदारसंघातून उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती, याकडे शशीधर रेड्डी यांनी लक्ष वेधलं. त्यामुळे अझरुद्दीनला मंत्री बनवण्यामागे काँग्रेसचा चांगला हेतू नाही. ज्युबली हिल्स विधानसभा मतदारसंघातील मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न आहे अशी टीका शशीधर रेड्डी यांनी केली.

काँग्रेसची भूमिका काय?

तेलंगण प्रदेश काँग्रेस समितीचे प्रवक्ते सय्यद निझामुद्दीन यांनी भाजप आणि भारत राष्ट्र समितीवर उलटा आरोप केला. मोहम्मद अझरुद्दीनला विरोध म्हणजे अल्पसंख्यांकांना राजकीय प्रतिनिधीत्व नाकारण्याची भाजप आणि बीआरएसची भूमिका आहे असं सय्यद निझामुद्दीन म्हणाले.

व्यक्तिगत जीवनामुळे चर्चेत

मोहम्मद अझरुद्दीनला देशभरात लोक उत्तम क्रिकेटर म्हणून ओळखतात. हैदराबादमधून येणाऱ्या अझरुद्दीने जागतिक क्रिकेटमध्ये आपला ठसा उमटवला. अनेक वर्ष तो भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार होता. १९९२,१९९६ आणि १९९९ अशा सलग तीन वर्ल्ड कपमध्ये मोहम्मद अझरुद्दीने भारतीय क्रिकेट संघाचं प्रतिनिधीत्व केलं. मोहम्मद अझरुद्दीन त्याच्या व्यक्तीगत जीवनामुळे सुद्धा चर्चेत राहिला.

## व्येंकटेश मंदिरात

चेंगराचेंगरी झाल्याचा अंदाज आहे.या चेंगराचेंगरीत नऊ भाविकांचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. जखमी मंदिराच्या जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी या घटनेनंतर ट्विट करत मृत्यू कुटंबीयांच्या परिवारासोबत सहवेदन व्यक्त केले आहे.

ते म्हणाले, या घटनंतर वेंकटेश्वर मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीची घटना ही दु:खद आहे. मृतांच्या कुटुंबीयांबद्दल मी माझ्या तीव्र संवेदना व्यक्त करतो. जखमींना सर्वोत्तम उपचार देण्याचे निर्देश मी अधिकाऱ्यांना दिले आहेत. मी स्थानिक अधिकाऱ्यांना आणि लोकप्रतिनिधींना घटनेच्या ठिकाणी भेट देण्यास आणि मदत कार्यांवर लक्ष ठेवण्यास सांगितले आहे.

ला. अनेक वर्ष तो भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार होता. १९९२,१९९६ आणि १९९९ अशा सलग तीन वर्ल्ड कपमध्ये मोहम्मद अझरुद्दीने भारतीय क्रिकेट संघाचं प्रतिनिधीत्व केलं. मोहम्मद अझरुद्दीन त्याच्या व्यक्तीगत जीवनामुळे सुद्धा चर्चेत राहिला.

## पंजाबमध्ये सिकंदर

शिकवत पैलवान केले आहे.१ नोव्हेंबर रोजी सिकंदरचा वाढदिवस होता, घरी वाढदिवसाची तयारी केली होती, मात्र आदल्या दिवशी त्याच्या अटकेची माहिती आली, अशी प्रतिक्रिया रशीद शेख यांनी दिली.१ नोव्हेंबर १९९८ रोजी सिकंदरचा जन्म झाला होता.

शस्त्र तस्करी प्रकरणात सिकंदर शेखचा सहभाग असल्याची माहिती पंजाब पोलिसांनी दिली आहे. कोल्हापूरच्या गंगावेश तालीम घडलेल्या सिकंदर शेखला अटक करण्यात आली. या संपूर्ण प्रकरणावर सिकंदरचे वडील, पैलवान रशीद शेख यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. माझ्या घराची झडती घेतली असता, माझ्या घरात एक चाकू सुद्धा सापडणार नाहीय. मग शस्त्र तस्करी प्रकरणात माझ्या मुलाच कसं काय नाव आलं? त्याचं कोडं पडलं आहे. माझ्या घरावर अजून स्लॅब देखील नाही,पत्र्याच्या घरात राहतो, अशी गरिबी परिस्थिती जीवन जगत आहोत. माझ्या मुलाला फसवलं आहे, असं रशीद शेख यांनी सांगितले.पुणे येथे २०२३ मध्ये झालेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत पंचांच्या निर्णयावर आक्षेप घेतल्याने चर्चेत आलेले पैलवान सिकंदर शेख यांनी २०२४ मध्ये महाराष्ट्र केसरी किताब जिंकला. आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू म्हणून त्यांना क्रीडा कोट्यातून लष्करात नोकरी मिळाली होती, पण त्यांनी ती सोडली. गेल्या पाच-सहा महिन्यांपासून ते पंजाबमध्ये वास्तव्यास होते. पंजाबमधील कुस्तीच्या वातावरणाचा फायदा घेत त्यांनी आपल्या खेळाला अधिक धार आणली.